शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजूरीबाबत.......
प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारात सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : सकआ २०१९/प्र.क्र.२३६/ आस्था २

मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,

मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा</u> :- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावि-२, दि.६.६.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

सार्वजनिक आरोग्य विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय दि.६ जून, २०१९ अन्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून आयुक्त, समाज कल्याण, पुणे व आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यालयांमधील शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांच्या रु.३,००,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस विभाग प्रमुखांना असलेल्या वित्तीय अधिकारांत अंशत: बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून आयुक्त, समाज कल्याण, पुणे व आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यालयांमधील शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांच्या रु.३,००,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस विभाग प्रमुखांना असलेल्या वित्तीय अधिकारामध्ये पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत-

अ.क्र.	पदनाम	(सक्षम प्राधिकारी)	पुर्वीचे अधिकार	सुधारित अधिकार
१	आयुक्त, समाज कल्याण, पुणे (आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील पदांकरिता)	विभाग प्रमुख	रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंत	रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) वरील परंतु, रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे
२	आयुक्त, अपंग कल्याण, पुणे (आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील पदांकरिता)			
३	प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण	प्रादेशिक विभाग प्रमुख	निरंक	रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतची प्रकरणे

२. रु.३,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदींच्या अधीन राहून मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार पुर्वी प्रमाणेच संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना राहतील.

३. या शासन निर्णयान्वये प्रत्यार्पित केलेल्या अधिकारांव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमधील सर्व तरतुदी पुर्वीप्रमाणेच लागू राहतील.

४. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांना देखिल लागू करण्यात यावा.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१७१५१९५९१९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.09.17 15:30:53 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (सा.न्याय) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (सा.न्याय) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव, सा.न्या.वि.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
४. आयुक्त, समाजकल्याण, पुणे
५. आयुक्त, अपंगकल्याण, पुणे
६. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
७. महालेखापाल) लेखा व अनुज्ञेता)/लेखा परीक्षा (महाराष्ट्र ,२/१-मुंबई/नागपूर
८. सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण
९. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
१०.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
११.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३.आस्था-२ संग्रहार्थ